मुंबई शहर वाहतूक प्रकल्प - III अंतर्गत

दोन स्थानकामधील विभागातील (मिड सेक्शन) बेकायदेशीर प्रवेश रोखण्यासाठी उपाय योजना

# सामाजिक प्रभावाचे मूल्यमापन व पुनर्वसन कृती आराखडा

## कार्यकारी सारांश

मुंबई शहर वाहतूक प्रकल्प - III प्रकल्पाचा खर्च रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासन 50:50 या प्रमाणात करणार आहे. तसेच सदरहू प्रकल्पाला एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्वेस्टमेंट बँकेचे अर्थ सहाय घेण्यात येणार आहे. मुंबई शहर वाहतूक प्रकल्प - III अंतर्गत दोन स्थानकामधील विभागातील बेकायदेशीर प्रवेश करून रेल्वे मार्ग ओलांडणे (मिड सेक्शन) रोखण्यासाठी उपाय योजना करण्यात येणार आहेत. मुंबई उपनगरातील एकूण ३६ ठिकाणी उपाय योजना करण्यात येणार आहे. त्यापैकी १९ ठिकाणे हे मध्य रेल्वेच्या मुंबई छ. शि. म. ट ते कर्जत / कसारा या मुख्य मार्गावर आहेत. तसेच ११ ठिकाणे हार्बर मार्गावर व ६ ठिकाणे पश्चिम रेल्वे वर आहेत.

मुंबई शहर वाहतूक प्रकल्प - III प्रकल्पासाठीचा पुनर्वसन धोरण आराखडा (Resettlement Policy Framework) हा भारतातील संबंधित कायद्यातील तरतुदी, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी घेतलेले निर्णय व जारी केलेले मार्गदर्शक तत्त्वे तसेच एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्वेस्टमेंट बँकेचे या बाबतचे धोरण लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहे. नुकसान भरपाईची पात्रता सूची तयार करताना संबंधित प्रकल्प ग्रस्त कुटुंबाचे होणारे सर्व प्रकारचे नुकसान लक्षात घेण्यात आले आहे.

सर्व ३६ ठिकाणांचे सामाजिक प्रभावाचे मूल्यमापन २०१७ मध्ये करण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे कोणतीही कुटुंब बाधित होत नाही.

एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्वेस्टमेंट बँके च्या मार्गदर्शक तरतुदी प्रमाणे या प्रकल्पाला श्रेणी “ ग “ (Category C) देण्यात आली आहे.

८ ठिकाणी जनतेशी सल्लामसलत करण्यात आली. एकूण लोकांचा प्रकल्पाला पाठिंबा आहे. या प्रकल्प मुळे सुरक्षितेत वाढ होऊन अपघाताचे प्रमाण बऱ्याच प्रमाणात कमी होईल.

तक्रार निवारण यंत्रणेमध्ये, जमीन अधिग्रहण, R&R आणि इतर समस्यांशी संबंधित समस्यांवरील तक्रारींचे निवारण करण्यासाठी तक्रार निवारण समिती (GRC) क्षेत्रीय स्तरावर आणि मुख्यालय

स्तरावर समाविष्ट आहे. GRC च्या निर्णयाशी पूर्णपणे संतुष्ट नसल्यास प्रकल्पग्रस्त AIIB कडे जाऊ शकतात तसेच प्रकल्पग्रस्तांना न्याया लयात जाण्याचा पर्याय देखील असेल.

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन (MRVC) ही प्रकल्पाची अंमल बजावणी करणारी  एजन्सी असेल, जी प्रकल्प अंमल बजावणीसाठी जबाबदार असेल.

प्रकल्पाचे काम ऑक्टोबर २०१८ पासून सुरू आहे व पाच वर्षात पूर्ण होणे अपेक्षित आहे.

----------------

.